Google ला सर्च करा

गुरुमाऊली

# माझा अभ्यास

Study From Home

गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe **इयत्ता – सहावी ( 11 ऑगस्ट ) विषय – मराठी** Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट

# दिवस बेचाळीस :






गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

टेस्ट सोडवा

## बाकी वीस रुपयांचं काय?

### वाचा व समजून घ्या.

मराठी भाषेत वयाने आणि अधिकाराने मोठ्या असलेल्या व्यक्तीशी बोलताना 'तू' ऐवजी 'तुम्ही' किंवा 'आपण' संबोधतात. त्या वेळेस एकच व्यक्ती असूनही बोलताना अनेकवचनी उल्लेख होतो, त्याला आदरार्थी अनेकवचन म्हणतात. मी, तू किंवा तुम्ही यांचा एकत्र उल्लेख करताना 'आपण' या सर्वनामाचा वापर करतात, तर बोलताना दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींचा स्वतःसहित एकत्र उल्लेख करायचा असेल, तर 'आम्ही' हे सर्वनाम वापरतात.

- खालील उतारा काळजीपूर्वक वाचून आशयानुसार दोन परिच्छेद करा. उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.

समजा दमयंती जेवत असेल अन् तिला कोणीतरी म्हणाले, 'खेळायला येतेस का ?' तर दमयंती जेवण अर्धवट सोडून खेळायला पळेल. एवढा खेळ तिला जीव की प्राण. मग तो कोणताही खेळ असो, मैदानी असो वा बैठा खेळ असो. दमयंती त्यात तल्लीन होऊन जाते. असा एकही खेळ नाही जो तिला आवडत नाही. बैठ्या खेळात ती जेवढी तरबेज तेवढीच मैदानी खेळातही. सागरगोटे, चल्लसआठ, काचापाणी, पत्त्यातील सावकार-भिकार अशा खेळांत जिंकणे म्हणजे तिच्या डाव्या हातचा मळ. मैदानी खेळ खेळताना कधी कधी ती एवढी हमरीतुमरीवर येते, की जणू आता तिचे पुढच्या खेळाडूबरोबर कडाक्याचे भांडण होईल; पण एकदा का खेळ संपला, की प्रतिस्पर्ध्यांच्या हातात हात घालून चाललेली दिसणार हे नक्की. दमयंती म्हणते, "खेळामुळे शरीराचा व्यायाम होतो. मन ताजेतवाने होते. हाता-पायांचे स्नायू बळकट होतात. हृदय व फुप्फुसांची कार्यक्षमता वाढते. आपल्याला दिवसभराच्या कामाने आलेला थकवा, मरगळ जाऊन आपल्यात नवा जोश, उत्साह निर्माण होतो. कबड्डी, खो-खो, लंगडी, डॉजबॉल यांसारख्या मैदानी खेळांमुळे स्वतःवर येणाऱ्या संकटांशी सामना करण्याची ताकद आपल्यांत निर्माण होते." प्रत्येकाने रोज थोडे का होईना पण खेळलेच पाहिजे. तुम्हांला निरोगी राहायचे असेल, तर योग्य आहाराबरोबर योग्य व्यायाम असायला हवा अन् खेळांतून शरीर व मनाला मिळणारा व्यायाम सर्वांगसुंदर व्यायाम असतो, नाही का ?

**ओळखा पाहू!**

मागे आणि पुढे दोन तोंडे असतात मला,
जमीन भुसभुशीत करण्याची माझी कला,
शेतकऱ्याचा मित्र म्हणून ओळखतात मला.
**ओळखा कोण?**

पहाट होताच तुम्हांला दिसतो,
तेव्हाच दिवस सुरू होतो,
लवकर उठून पाहायचा,
तुम्ही निश्चय करा,
आहे सर्वांत मी, तेजस्वी तारा.
**ओळखा कोण?**

**शिक्षकांसाठी :** सर्वनामांच्या विविध प्रकारांची उदाहरणे देऊन उपयोजनात्मक सराव करून घ्यावा. दिलेल्या उताऱ्याचे प्रकट वाचन व मूकवाचन विद्यार्थ्यांकडून करून घ्यावे.


वाचा व सोडवा.

# 4 अपूर्णांकांवरील क्रिया

टेस्ट सोडवा

**जाणून घेऊया.**


## संख्यारेषेवर अपूर्णांक दाखवणे




$\frac{4}{10}$ व $3\frac{7}{10}$ हे अपूर्णांक संख्यापट्टीवर दाखवणे सोपे आहे कारण मोजपट्टीवर प्रत्येक सेंटिमीटरचे दहा समान भाग असतात. एककात शून्यापासून चौथा भाग $\frac{4}{10}$ हा अपूर्णांक दाखवतो. 3 व 4 यांच्यामधील दहा समान भागांपैकी 3 च्या पुढील 7 वी खूण ही $3\frac{7}{10}$ हा पूर्णांकयुक्त अपूर्णांक दाखवते.

उदा. संख्यारेषेवर $\frac{2}{3}$ , $\frac{4}{3}$, $\frac{7}{3}$ हे अपूर्णांक दाखवू.

खालील पट्टीवर प्रत्येक एककाचे 3 समान भाग केले आहेत.




**हे मला समजले.**

**एखादा अपूर्णांक संख्यारेषेवर दाखवायचा असेल, तर संख्यारेषेवर प्रत्येक एककाचे अपूर्णांकाच्या छेदाइतके समान भाग करावे लागतात.**


**विचार करा.**

संख्यारेषेवर $\frac{3}{10}$, $\frac{9}{20}$, $\frac{19}{40}$ हे अपूर्णांक दाखवण्यासाठी किती मोठा एकक घ्यावा ?


## सरावसंच 11

1. खालील रेषांवर A व B बिंदू कोणते अपूर्णांक दर्शवतात ते रिकाम्या चौकटींत लिहा.


(1)




(2)




(3)




4 Operations on Fractions

टेस्ट सोडवा

Read and solve.

Let's learn.


## Showing Fractions on the Number Line




It is easy to mark the fractions $\frac{4}{10}$ and $3\frac{7}{10}$ on the number line because on the scale, every centimetre is divided into 10 equal parts. In the first unit, the fourth mark from zero shows the fraction $\frac{4}{10}$. The $7^{th}$ mark of the 10 equal parts after 3, between the numbers 3 and 4, shows the fraction $3\frac{7}{10}$.

**Example :** Let us show the fractions $\frac{2}{3}$, $\frac{4}{3}$, $\frac{7}{3}$ on the number line.

On the number line below, every unit is divided into 3 equal parts.




Now I know –

**If a fraction has to be shown on a number line, every unit on the number line must be divided into as many equal parts as the denominator of the fraction.**


Think about it.

If we want to show the fractions $\frac{3}{10}$, $\frac{9}{20}$, $\frac{19}{40}$ on the number line, how big should the unit be?


## Practice Set 11

1. What fractions do the points A and B show on the number lines below?


(1)




(2)




(3)



टेस्ट सोडवा

## Read and understand. Revision

**Radhika** : Why, everyone will enjoy a sugarcane treat!

**Grandpa** : Yes, you have understood the meaning of treat.

**Gauri** : Please continue, Grandpa, let's listen to the story. But tell me please, does it mean that they were going to steal from the farmer?

**Shreya** : Maybe, but let's listen to the story. Grandpa, let's please have the questions later.



POINTERS

WP7NBU

1. **Read the conversation aloud.**

2. **Group work**

Form group of 4 or 5. One person tells/reads aloud a story or a poem or a passage. Others interrupt him/her politely, using any suitable expression from the box. The person speaking/reading should answer or explain without getting angry. If the person gets angry, someone else takes up the reading.

Sometimes you need to interrupt a person who is speaking to you. But you must do so politely. The expressions given below can be used to interrupt someone politely.

| Interruptions | Responses |
|---|---|
| Pardon, ...<br>Excuse me, Sir / Madam / ... | Yes? |
| Can you /Could you repeat that, please?<br>Will you please say that again? | Sure.<br>Certainly. |
| Sorry, but I did not get the last word / sentence. | Ok, I will repeat it. |
| Could you please explain that?<br>Could you explain the meaning of ..........? | I will explain it afterwards.<br>Not now. Later on. |
| Excuse me, can I ask something? | Go ahead. |

टेस्ट सोडवा

सराव

पाठ वाचा व समजून घ्या.

# ४. वैदिक संस्कृती

## ४.३ शेती, पशुपालन, आर्थिक आणि सामाजिक जीवन

वैदिक काळात शेती हा प्रमुख व्यवसाय होता. अनेक बैल जुंपलेल्या नांगराने नांगरट केली जाई. नांगराला लोखंडाचा फाळ बसवत असत. अथर्ववेदामध्ये पिकावर पडणारी कीड, पिकाचा विध्वंस करणारे प्राणी आणि त्यांवरील उपाय यांचाही विचार केलेला आढळतो. खत म्हणून शेणाचा उपयोग केला जात असे.

वैदिक काळात घोडा, गाय-बैल, कुत्रा या प्राण्यांना विशेष महत्त्व होते. गाईंचा विनिमयासाठी उपयोग केला जाई. त्यामुळे गाईंना विशेष किंमत होती. इतरांनी गाई चोरून नेऊ नयेत म्हणून विशेष काळजी घेतली जाई. घोडा हा अत्यंत वेगाने पळणारा प्राणी. त्याला माणसाळवून रथाला जोडण्यात वेदकालीन लोक निष्णात होते. वेदकालीन रथाची चाके आऱ्यांची होती. भरीव चाकांपेक्षा आऱ्यांचे चाक वजनाने हलके असते. घोडा जोडलेले, आऱ्यांच्या चाकांचे वेदकालीन रथ अर्थातच खूप वेगवान होते.



वेदकालीन रथ

**माहीत आहे का तुम्हांला?**

घोड्याला 'अश्व' असे म्हणतात. एखाद्या इंजिनचा वेग मोजण्यासाठी जे एकक वापरले जाते त्याला 'अश्वशक्ती' (हॉर्स पॉवर) असे म्हणतात.



त्या काळात शेती आणि पशुपालन यांच्याखेरीज इतर अनेक व्यवसायांचाही विकास झाला होता. व्यावसायिक, कारागीर समाजव्यवस्थेचे महत्त्वाचे घटक होते. 'श्रेणी' या नावाने ओळखले जाणारे त्यांचे स्वतंत्र संघ होते. अशा श्रेणींच्या प्रमुखाला 'श्रेष्ठी' म्हणत असत. परंतु हळूहळू व्यावसायिक कारागिरांचा दर्जा दुय्यम होत गेला.

त्या काळात समाजात ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे वर्ण होते. हे वर्ण व्यवसायावरून ठरत. नंतरच्या काळात वर्ण जन्मावरून ठरू लागले. त्यामुळे जाती निर्माण झाल्या. जातिव्यवस्थेमुळे समाजात विषमता निर्माण झाली.

आदर्श आयुष्य कसे जगावे, यासंबंधीच्या काही कल्पना वेदकाळात रूढ झाल्या होत्या. त्यांमध्ये जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या चार टप्प्यांना 'चार आश्रम' असे म्हटलेले आहे. पहिला आश्रम म्हणजे 'ब्रह्मचर्याश्रम'. गुरूजवळ राहून विद्या प्राप्त करण्याचा हा काळ.

ब्रह्मचर्याश्रम यशस्वी रीतीने पार पाडल्यानंतरचा पुढचा टप्पा म्हणजे गृहस्थाश्रम. या काळात पुरुषाने कुटुंब आणि समाज यांच्यासाठी असलेली आपली कर्तव्ये पत्नीच्या साहाय्याने पार पाडावीत, अशी अपेक्षा असे. तिसरा आश्रम म्हणजे 'वानप्रस्थाश्रम'. या

## निरीक्षण करा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

# ४. हवा व हवामान

### सांगा पाहू.

भारतातील पुढील ठिकाणी १० जून या दिवशी वातावरणाची स्थिती पुढीलप्रमाणे आहे. या तक्त्याच्या आधारे प्रश्नांची उत्तरे सांगा.

| अ. क्र. | शहर | राज्य | वेळ | हवा कशी आहे ? |
|---|---|---|---|---|
| १. | कोच्चि | केरळ | दु. १२.३० वा. | ढगाळ आहे. |
| २. | भोपाळ | मध्यप्रदेश | दु. १२.३० वा. | कडक ऊन पडले आहे. |
| ३. | मसुरी | उत्तराखंड | दु. १२.३० वा. | थंड हवा व बेताचे ऊन. |

- कोणत्या ठिकाणाचे वाळत घातलेले कपडे लवकर वाळतील ते सकारण सांगा.
- कोणत्या ठिकाणी कपडे उशिरा वाळतील व का ?
- या ठिकाणांच्या वातावरणाची स्थिती नेहमी अशीच राहील की त्यात बदल होईल ?

### भौगोलिक स्पष्टीकरण

वरील प्रत्येक ठिकाणावरील १० जून या दिवशी हवेची स्थिती भिन्न आहे. कोच्चिला ढगाळ हवा आहे. म्हणजे सूर्यप्रकाश नाही. पावसाळा नुकताच सुरू झाला आहे. त्यामुळे हवेत बाष्पाचे प्रमाण अधिक असते. म्हणून कपडे लवकर वाळत नाहीत. अशी स्थिती तुम्हीही पावसाळ्यात अनुभवली असेल.

भोपाळला कडक ऊन आहे. ओल्या कपड्यांतील पाण्याचे बाष्पात पटकन रूपांतर होईल व कपडे लवकर वाळतील.

मसुरी कर्कवृत्ताच्या उत्तरेस असल्याने तेथे सूर्याची उष्णता कमी मिळते. पर्वतीय प्रदेशामुळे हवा थंड असते. थंड हवा व बेताच्या उन्हामुळे कपडे वाळण्यास जास्त कालावधी लागतो.

वातावरणातील उष्णता, बाष्प तसेच वाहत्या वाऱ्याने देखील कपडे लवकर वाळतात. वातावरणाच्या स्थितीत याप्रमाणे सतत बदल होत असतात. वातावरणातील हे बदल आपणही नेहमी अनुभवत असतो.

### सांगा पाहू.

तुमच्या परिसरातील कालच्या किंवा आजच्या हवेशी पुढीलपैकी कोणकोणती विधाने जुळतात ते पहा. याशिवाय आणखी कोणती विधाने तुम्हांला सुचतात.



आकृती ४.१ : शेकोटीला बसलेली मुले

- सकाळी थंडी होती.
- दुपारी उकडत होते.
- दुपारी अचानक पाऊस आला.
- पहाटे गार वारा सुटला होता.
- संध्याकाळी ढग जमा झाले होते.
- रात्री फार छान चांदणे पडले होते, वाऱ्याचीही छान झुळूक येत होती.

### ❊ हवा

एखाद्या ठिकाणची विशिष्ट वेळेला असणारी वातावरणाची स्थिती आपण प्रत्येकजण अनुभवत असतो. तिचे वर्णनही आपण करतो. ही स्थिती अल्पकालीन असते. यालाच आपण त्या ठिकाणाची हवा म्हणतो. उदा., थंड हवा, गरम हवा, कोरडी हवा, दमट हवा, इत्यादी.

सजीवांतील विविधता आणि वर्गीकरण

टेस्ट सोडवा

# वाचा व समजून घ्या.

**करून पहा.** डबक्यातील पाण्याचा एक थेंब काचपट्टीवर घ्या. सूक्ष्मदर्शकाखाली त्याचे निरीक्षण करा. काय दिसते?



पाण्याच्या डबक्यातील पाण्याचा थेंब सूक्ष्मदर्शकाखाली पाहिला, की त्यामध्ये हालचाल करणारे असंख्य सूक्ष्मजीव दिसतील. सतत हालचाल करणारा अमिबा दिसेल. अमिबाप्रमाणे पॅरामेशिअम हासुद्धा **एकपेशीय** प्राणी आहे.

घोडा, अस्वल, कासव असे इतर प्राणी मात्र **बहुपेशीय** प्राणी आहेत.

**सांगा पाहू !** १. आपल्या पाठीच्या मध्यावरून जी हाडांची माळ जाते तिला काय म्हणतात?







पाठीचा कणा असलेल्या व नसलेल्या प्राण्यांचे **पृष्ठवंशीय व अपृष्ठवंशीय प्राणी** असे दोन गट पडतात.

साप, मानव, पक्षी, मासा, कांगारू हे पृष्ठवंशीय प्राणी आहेत. गोगलगाय, झुरळ, गांडूळ अशा प्राण्यांना पाठीचा कणा नसल्याने ते अपृष्ठवंशीय प्राणी आहेत.

२. अंडी घालणारे, पिलांना जन्म देणारे प्राणी कोणकोणते आहेत?

स्वत:सारखा दुसरा जीव निर्माण करणे म्हणजे पुनरुत्पादन हे आपण शिकलो आहोत. कोंबडी अंडी घालते व ती उबवते. काही दिवसांनंतर त्यातून पिले बाहेर येतात. गाय वासराला जन्म देते. गाईच्या वासराची वाढ गाईच्या शरीरातच होते. प्रजनन प्रकारानुसार प्राण्यांचे **अंडज** व **जरायुज** प्राणी असे दोन प्रकार आहेत.

३. घोडा, अस्वल, कासव, सुसर, मासा, हरीण, बेडूक हे प्राणी कोठे आढळतात?

प्राण्यांच्या राहण्याच्या ठिकाणांवरून त्यांचे **भूचर** आणि **जलचर** असे सर्वसाधारण वर्गीकरण केले जाते, परंतु बेडूक, सॅलेमेंडर, टोड हे प्राणी जमीन व पाणी या दोन्ही ठिकाणी राहतात, म्हणून त्यांना **उभयचर** म्हणतात.



घार, गरुड, कावळा, फुलपाखरे, मधमाशी हे विविध ठिकाणी राहत असले तरी हवेमध्ये संचार करतात. त्यांना **खेचर** असे म्हणतात.



**जरा डोके चालवा.** प्राण्यांचे वर्गीकरण कोणकोणत्या निकषांच्या आधारे केले जाते?

# 3. Diversity in Living Things and their Classification

**Read and understand.**



**Try this.**

Take a drop of water from a puddle and place it on a glass slide. Observe it under a microscope. What do you see?





When a drop of water from a puddle is seen under a microscope, innumerable microbes can be seen moving about in it. You will see the continuously moving amoeba. The paramoecium is also a **unicellular** animal like the amoeba.

A horse, a bear, a tortoise are **multicellular** animals.



**Can you tell?**







1. What is the chain of bones in the centre of our back called?

Animals with a vertebral column and those without it form two groups known as the **vertebrates** and **invertebrates**, respectively.

Snakes, birds, fish and kangaroos as also humans are vertebrate animals. Animals such as snails, cockroaches, earthworms do not have a vertebral column and therefore they are invertebrate animals.

2. Name some animals which lay eggs and others which give birth to their young ones.

We have learnt that producing another living thing like oneself is called reproduction. A hen lays eggs and hatches them. After a few days, the young chicks hatch out of the eggs. A cow gives birth to a calf. Before that, the calf grows within the cow's body. According to the mode of reproduction, animals are classified into two types, namely, **oviparous animals** which lay eggs and **viviparous animals** which give birth to their young ones.

3. Where are the animals, namely, a horse, a bear, a tortoise, an alligator, a fish, a deer and a frog to be found?



According to their habitat, animals are usually classified into **terrestrial** and **aquatic** animals. However, animals like a frog, salamander, toad live in both places, namely, land and water. Therefore, they are called **amphibious animals**.

A kite, an eagle, a crow, a butterfly, a honeybee all fly in the air, though they live in difference places. These animals are said to have an **aerial mode of life**.











**Use your brain power!**

What are the different criteria used to classify animals?

टेस्ट सोडवा

● **सुनो और समझो :**

रियाज


## . मेरा अहोभाग्य

– *चंद्रगुप्त विद्यालंकार*

**जन्म :** १९०६ **रचनाएँ :** 'संदेह', 'मेरा बचपन', 'न्याय की रात', 'मेरा मास्टर साहेब', 'चंद्रकला', 'पगली', 'तीन दिन', 'भय का राज्य', 'देव और मानव' आदि । **परिचय :** आपने साहित्य एवं पत्रकारिता के क्षेत्र में उल्लेखनीय कार्य किया है ।
प्रस्तुत पाठ में लेखक ने गुरुदेव रवींद्रनाथ ठाकुर जी से हुई भेंट से संबंधित संस्मरण बताया है ।

### नाम तुम्हारे

✻ चित्र देखकर उचित सर्वनाम ◯ में लिखो : (तू, मैं, वह, यह, क्या, जैसा–वैसा, अपने–आप)



फरवरी १९३६ में मुझे शांति निकेतन जाना था। वहाँ एक साहित्यिक कार्यक्रम होने वाला था । मैं बहुत ही उल्लसित था क्योंकि उस कार्यक्रम की अध्यक्षता स्वयं गुरुदेव रवींद्रनाथ जी करने वाले थे ।

निश्चित दिन कोलकाता से हम बहुत सारे लोग शांति निकेतन के लिए रवाना हुए । लगभग एक दर्जन हिंदीवालों का यह दल शांति निकेतन के सुंदर अतिथि–भवन में ठहराया गया । यह अतिथि भवन अशोक वृक्षों




के सघन उपवन के बीचोबीच बनाया गया था । बहुत ही सुंदर, बड़ी और अच्छी इमारत थी वह ! जैसा सोचा था वैसा ही पाया । ऊपर की मंजिल के एक कमरे में हमें ठहराया गया । कमरे के बाहर एक विस्तृत बरामदा था । बरामदे में खड़े होकर अगर बाहर देखा जाए तो सामने ही सघन बकुल वृक्ष दिखाई देते थे ।

दूसरे दिन प्रात:काल ही हमें बताया गया कि गुरुदेव का स्वास्थ्य ठीक नहीं है, अत: कार्यक्रम की बैठक में वे नहीं आ पाएँगे । मैं बहुत निराश हो गया तथापि हमें जब यह मालूम पड़ा कि उनके डॉक्टर ने हम लोगों को केवल पंद्रह मिनटों का समय दिया है, जिसमें गुरुदेव के दर्शन तथा उनके साथ संक्षिप्त वार्तालाप भी हो सकता है तब हमारी खुशी का ठिकाना न रहा । हम बेसब्री से उस क्षण का इंतजार करने लगे ।

मध्याह्न के बाद गुरुदेव की भेंट हुई । करीब चार बजे होंगे । गुरुदेव की धारणा थी कि कुछ दो–तीन आदमी ही होंगे । पर जब उन्होंने हम चौदह जनों को

❑ संस्मरण में आए सर्वनाम शब्दों को (मैं, वह, कुछ, जैसा–वैसा, अपने–आप) श्यामपट्ट पर लिखें । इनके भेदों को प्रयोग द्वारा समझाएँ और अन्य शब्द कहलाएँ । विद्यार्थियों से कृति करवाने के पश्चात उनका वाक्यों में प्रयोग करवाकर दृढ़ीकरण कराएँ ।

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

| सहावी मराठी | सहावी गणित | सेमी गणित | सहावी इंग्रजी | सहावी इतिहास |
|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| सहावी भूगोल | सहावी विज्ञान | सेमी विज्ञान | सहावी हिंदी |
|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here